मुंबई सह राज्यातील महानगरपालिकां मधील रस्त्यांवरील खड्डयांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१७७/नवि-२०

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

तारीख : १८ ऑगस्ट, २०१८

संदर्भ :-

१. शासन निर्णय क्रमांक बीएमसी-२०१३/प्र.क्र.८९६/नवि-२१,दिनांक ९.०७.२०१५

२. शासन परिपत्रक क्रमांक बीएमसी-२०१३/प्र.क्र.८९६/नवि-२१,दिनांक ०४.०८.२०१५

शासन परिपत्रक :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारील रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती तसेच सदर रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीतील रस्त्यावरील पाण्याचा निचरा वेळीच होत नाही. तसेच सदर रस्त्यांमध्ये विविध शासकीय निमशासकीय, खाजगी यंत्रणेद्वारे विविध सेवा वाहिन्या टाकताना रस्त्यांचे खोदकाम करण्यात येते. या कारणास्तव बऱ्याचदा रस्त्यांची दुरावस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय व परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. तसेच रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती व बांधकामासाठी शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरएमआर-१०८२/प्र.क्र.३१५/रस्ते-१, दि.३०.०९.२०१६ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचना तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या अखत्यारीतील रस्त्यांचे बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीच्या कार्यपध्दतीचा आढावा घेऊन त्यामध्ये सुधारणा करुन रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे.

मुंबईसह राज्यातील काही महानगरपालिकेतील रस्त्यांच्या निकृष्टतेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने suo moto जनहित याचिका क्रमांक ७१/२०१३ दाखल केली आहे. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४ फेब्रुवारी व १२ एप्रिल, २०१८ रोजीच्या आदेशान्वये "राज्यातील मुंबईसह सर्व महानगरपालिकांमध्ये रस्त्यांतील खड्डयांच्या संदर्भात आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाची प्रत www.bombayhighcourt.nic.in या वेबसाईटवर कृपया पहावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार परिच्छेद क्रमांक ४६ नुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

मा. उच्च न्यायालयाचे आदेश परिच्छेद क्रमांक ४६		नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना द्यावयाच्या सुचना
i)	Except for those interim directions which we have expressly declined to continue, all other interim directions which are not in any way inconsistent with the final directions will continue to operate;	
ii)	The directions contained in clauses (ii) to (xi) of paragraph 34 of the judgment and order dated 20th May 2015 will operate as the final directions with following modifications:	
(A)	All the Municipal Corporations, MMRDA, MSRDC, CIDCO and MbPT as well as the State Government shall maintain all the streets/roads including footways/ footpaths within its respective jurisdictions in good and proper condition. It shall be their responsibility to keep the streets and footways properly levelled and surfaced. It shall be their responsibility to ensure that potholes and ditches thereon are properly filled in. The work of filling in the potholes shall be carried out scientifically as an on going project;	महानगरपालिकांनी/ नगरपरिषद/ नगरपंचायती यांच्या आखत्यारीतील पदपथ / पादचारी मार्गासह रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असल्याने त्यांच्या अखत्यारीतील रस्ते / पदपथ सुस्थितीत ठेवावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांनी खड्डे / भेगा शास्त्रोक्त पध्दतीने बुजविण्याबाबत यथोचित कार्यवाही करावी.
(B)	While granting permissions to various authorities to do digging work on the streets, a condition shall be incorporated by all the Municipal Corporations/other Authorities of prominently displaying at the site of the work the following details : (a) the name, address and contact details of the agency which is doing the digging work and (b) the extent of the digging work permitted and (c) the period within which the work shall be completed. The display boards shall also record the outer limit within which the streets shall be restored to its original condition. Similar Boards shall be splayed at the sites where major	विविध प्राधिकरणे / संस्था / कंपनी यांना रस्ते खोदण्यासाठी परवानगी देतांना तसेच मोठया प्रमाणावर रस्त्यांची पुर्नबांधणी व दुरुस्ती करण्यासाठी कार्यारंभ आदेश देताना खालील अटी शर्ती नमूद कराव्यात. तसेच कामाच्या ठिकाणी ठळकपणे खालील बाबी दर्शविणारे फलक लावण्यात यावेत. १) काम करणाऱ्या अभिदात्याचे नाव, पत्ता व संपर्काबाबत तपशिल २) खोदकामास दिलेल्या

	repair/reconstruction work of streets is undertaken;	परवानगीची व्याप्ती. ३) काम पूर्ण करण्याचा अंदाजित कालावधी ४) कामानंतर कोठून कोठपर्यंत रस्ते पुर्ववत करण्याबाबत येतील याबाबतचा तपशिल
(C)	All the Municipal Corporations as well as MMRDA, MSRDC, CIDCO and MbPT shall set up a Grievance Redress Mechanism to enable the citizens to file complaints about the poor conditions of streets. The complaints shall be received by various modes including the following four modes: (a) Complaints in writing received at designated canters and in offices; (b) Complaints received through dedicated toll free number/s; (c) Complaints received through dedicated website; and (d) Complaints received by messages via cell phones.	रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी स्विकारण्यासाठी व त्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी "तक्रार निवारण यंत्रणा" सर्व महानगरपालिकांनी कार्यान्वित करावी. तक्रारी स्विकारण्यासाठी पुढील ४ स्तरीय पध्दती अवलंबिण्यात यावी. १) विहित तक्रार केंद्रावर तक्रार नोंदवुन घेण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी. २) तक्रार करण्यासाठी टोल फ्री नंबर सेवा उपलब्ध करण्यात यावी. ३) संकेतस्थळावरुन प्राप्त तक्रारी ४) भ्रमणध्वनी द्वारे लघुसंदेश व संभाषणाद्वारे प्राप्त तक्रारी स्विकारण्याची सोय उपलब्ध करण्यात यावी.
(D)	The facility of receiving complaints by the aforesaid methods shall be made available throughout the year. The dedicated websites shall be designed or improvised in such a way that citizens are able to upload the photographs showing the potholes on the streets or poor condition of streets on the website. Arrangement shall also be made to receive such photographs through cell phones. The websites shall be friendly to persons with visual disability;	तक्रारी स्विकारण्यासाठी उपरोक्त नमूद सोयी वर्षभरासाठी उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी. संकेतस्थळाद्वारे खड्डयांचे व रस्त्याच्या ना दुरुस्तीबाबत छायाचित्र सादर करता येईल याबाबत सुविधा निर्माण करण्यात यावी. भ्रमणध्वनी द्वारे देखील या पध्दतीने तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

		दृष्टीहीन अथवा दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींना देखिल संकेतस्थळ वापरण्याजोगे होईल याबाबत दक्षता घ्यावी
(E)	System of tracking shall be made available to track the actions taken on the basis of the complaints received by all four methods. Tracking facility shall be made available on the dedicated websites. Final action taken report on the basis of the complaints shall be uploaded on the websites within a period of three weeks from the date of receipt of the respective complaints. Wherever the citizens have forwarded the photographs of the sites either through cell phones or by uploading the same on the dedicated websites, along with the final report, photographs showing compliance made by carrying out repairs shall be also uploaded on the dedicated websites. All the Municipal Corporations and Authorities shall ensure that the mechanism in terms of the above directions is effectively made available latest by 31st July, 2018. We make it clear that till the mechanism as directed above is provided, the existing mechanism, if any, shall continue to function;	विविध माध्यमाद्वारे दाखल केलेल्या तक्रारीबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत संबंधितास माहिती मिळण्यासाठी ट्रॅकिंगची सुविधा तयार करण्यात यावी. कार्यवाहीचा अंतिम अहवाल अथवा माहिती छायाचित्रासह तक्रार प्राप्त झाल्यापासुन ३ आठवड्यात तक्रारदारास मिळण्यासाठी संकेतस्थळावर उपलब्ध करावी. या आदेशानुसार तक्रार निवारण यंत्रणा कार्यन्वित होईपर्यंत सध्या कार्यरत असलेली यंत्रणा सुरु ठेवावी.
(F)	In addition, the State Government shall create a similar centralized mechanism common for all the Municipal Corporations and Councils as well as all the Planning and other Authorities in relation to the streets in the State. The State and the Mumbai Municipal Corporation shall also consider whether complaints can be received on a website www.voiceofcitizents.doc. It shall be the obligation of the State to forthwith forward the complaints received through centralized mechanism to the concerned authorities which are responsible for the maintenance and repairs of the concerned stretches of streets. Such mechanism shall be made available on or before 31st July	तक्रार निवारण यंत्रणा तयार करण्याच्या अनुषंगाने विभागाने संदर्भाधीन अ.क्र.२ येथील दि.०४.०८.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. मुंबई महापालिकेतर्फे खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. a) Complaints in writing can be received in all ward offices, complaints officers,Dy.CE offices, Chief Engineers office and MCGM head office b) Dedicated toll number

	2018;	१८००२२१२९३ is operative. c) complaint can be lodge on portal.mcgm.gov.in d) Dedicated Whatsapp numbers given to all road engineers in २४ wards. e) In addition MCGM have mobile app MCGM २४ X ७ which can be downloaded from play store in any android mobile. केंद्रीय स्वरुपात तक्रार निवारण यंत्रणा तयार करण्याबाबत आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी शासनाने दिलेल्या सूचने प्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.
(G)	A very wide publicity shall be repeatedly given by all concerned authorities to the mechanism provided as aforesaid in all leading newspapers, at strategic locations on major streets, in various ward and other major offices as well as on the electronic media on or before 1st August 2018;	रस्त्यावरील खड्डयाबाबत व ना दुरुस्तीबाबतच्या तक्रारी स्विकरण्यासाठी व त्या संदर्भात कार्यवाहीसाठी तयार केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेस मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. प्रभाग कार्यालये, वृत्तपत्रे, इलेक्टॉनिक प्रसार माध्यमे यामधून वेळोवेळी प्रसिध्दी दयावी.
(H)	If the Committee appointed under the Government Resolution dated 28th September, 2012 has not submitted its recommendations, the same shall be submitted to the State Government on or before 31st July 2018. The State Government shall take appropriate policy decision on the basis of the said recommendations on or before 31st August, 2018;	सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दि.३०.०९.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(iii)	In view of the provisions of the Right of the Persons with Disabilities Act, 2016, necessary steps/ precautions shall be taken	दृष्टिहिन व दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींना सुलभपणे तक्रार दाखल

	by the all the concerned Authorities for protecting the rights of visually impaired persons as observed in the body of this Judgment;	करता येईल याबाबत तक्रार निवारण यंत्रणा तयार करतांना सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी.
(iv)	In addition to the above directions, we direct that as far as open manholes are concerned, the Municipal Corporations and other authorities bound by the directions shall take all possible steps to ensure that no open manholes are left unprotected without erecting barricades, without putting on warning lights and without providing effective warning to the citizens including those who are visually impaired. All necessary precautionary steps shall be taken to ensure that the incident of citizens falling inside the open manhole are not repeated;	मलनिस्सारण वाहिण्यावरील manholes पुरेशा संरक्षणाशिवाय उघडे ठेवू नयेत. उघडे manholes नागरीकांच्या निदर्शनास येण्यासाठी आवश्यक उपाय योजना संबंधित यंत्रणांनी करावी.
(v)	In addition to what is stated in the note placed on record by the State Urban Development Department, the State Government shall take appropriate policy decision about the terms and conditions which should be incorporated in relation to the road contracts which will ensure quality and durability of the work carried out. The State Government shall also take appropriate policy decision of laying down technical specifications of the streets and footways, the specifications of the material which should be used and specifications of the methods which should be used for construction or repair of streets. The State shall issue necessary directions to the authorities which do not have benefit of expertise of the Committee like STAC Committee appointed by the Mumbai Municipal Corporation. Appropriate policy decision shall be taken by the State Government on this aspect within a period of three months from the date on which the judgment is uploaded and necessary directions be issued to all concerned Local Authorities within a period of one month	याबाबत सर्व संबंधीत यंत्रणांना सूचना देण्यात येतील.

	thereafter;	
(vi)	We hold that the principles laid down in the judgment will equally apply to the Municipal Councils established under the said Act of 1965. Therefore, it will be appropriate that the State Government exercises its powers under the various provisions of the said Act of 1965 and especially under Section 312A of the said Act of 1965 for issuing directions to implement the directions issued by this Court. The State Government will ensure that the Director of the Municipal Councils issues such directions by using power under Section 312 of the said Act of 1965 to the Municipal Authorities. This exercise shall be completed within a period of two months from the date on which this judgment and order is uploaded. Equally, the State Government shall issue necessary directions to the Authorities such as MMRDA, MSRDC and Planning Authorities like CIDCO within the aforesaid period. Needless to add that even the said Authorities are under an obligation to create Grievance Redress Mechanism as per the directions contained in this judgment and order;	मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या अनुषंगाने नगरपरिषदा / नगर पंचायतींना सूचना देण्यासाठी आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना कळविण्यात आले असून त्यानुसार त्यांनी आवश्यक कार्यवाही करावी.
(vii)	We direct that all the Authorities who are bound by the directions of this Court will give adequate publicity as already directed regarding availability of the Grievance Redress Mechanism. Wide publicity shall be given to availability of such mechanism with all details as directed above at least thrice a year including in the first week of June of every year;	रस्त्यावरील खड्डयाबाबत व ना दुरुस्तीबाबतच्या तक्रारी स्विकरण्यासाठी व त्या संदर्भात कार्यवाहीसाठी तयार केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेस संकेतस्थळ प्रभाग कार्यालये, वृत्तपत्रे, इलेक्टॉनिक प्रसार माध्यमे यामधून वेळोवेळी प्रसिध्दी दयावी. वृत्तपत्रे, इलेक्टॉनिक प्रसार माध्यमे याद्वारे वर्षातून किमान तीनदा (यापैकी माहे जूनच्या पहिल्या आठवडयात एकदा) प्रसिध्दी दयावी.
(viii)	In addition, the State Government shall give adequate publicity to the Centralized	केंद्रीय स्वरुपात तक्रार निवारण

	Grievance Redress Mechanism created by it on all district, State or national highways as well as in major Government offices. The State Government shall appropriately publish the information regarding the availability of Centralized Grievance Redress Mechanism at various strategic places on the said highways so that the citizens are in a position to take benefit of Grievance Redress Mechanism;	यंत्रणा तयार झाल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(ix)	We also make it clear that it is the responsibility of all the Authorities who are bound by the directions of this Court to ensure that the work of the Grievance Redress Mechanism is monitored by making some officers responsible with a view to ensure that all complaints received through the same are promptly attended and communication to that effect is issued to the complainants. The compliance reports shall report compliance of this direction as well;	रस्त्यावरील खड्डयाबाबत व ना दुरुस्तीबाबत तक्रारी स्विकरण्यासाठी व त्या संदर्भात कार्यवाहीसाठी तयार केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेमार्फत आवश्यक पाठपुरावा व उचित कार्यवाही करण्यासाठी समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात यावा. तक्रार स्विकारणे व संबंधित अधिकाऱ्यास सादर करण्याची जबाबदारी समन्वय अधिकाऱ्याची राहील.
(x)	The State Government shall issue necessary directions to the Traffic Police as observed in paragraph29 of this Judgment on or before 15th July 2018;	याबाबत कार्यवाही करण्यासाठी गृह विभाग (परिवहन), मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार परिवहन विभागाने कार्यवाही करावी.
(xi)	We direct the State Government to call for the information from all Municipal Corporations and Municipal Councils as well as other Authorities regarding compliance with various directions issued under this judgment and order. The reports shall be called on quarterly basis. The said Authorities shall accordingly submit compliance reports to the State Government;	नगरपरिषद/नगरपंचायती यांनी रस्त्यावरील खड्डयाबाबत व ना दुरुस्तीबाबत सदर परिपत्रकातील सूचना नुसार केलेल्या कार्यवाहीचा व तक्रारी बाबतचा त्रैमासिक अहवाल आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना सादर करावा व संचालनालयाने तो एकत्रिरित्या

<table>
<tr><td>(xii)</td><td>Detailed compliance reports compiled by the State Government shall be regularly placed before this Court;</td><td rowspan="2">मा. उच्च न्यायालयास सादर करावा तसेच सर्व महानगरपालिकांनी त्यांचा त्रैमासिक अहवाल शासनास सादर करावा .</td></tr>
<tr><td>(xiii)</td><td>It is obvious that compliance reports will incorporate the details of the complaints received and the complaints which were successfully attended to;</td></tr>
</table>

जनहित याचिका क्रमांक ७१/२०१३ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उपरोक्त सुचनांप्रमाणे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही बाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता संबंधित महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायती यांनी घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक २०१८०८१८१५४२२८४३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2018.08.18 15:49:12 +05'30'

(शंकर जाधव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२
४. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव, गृह विकास (परिवहन), मंत्रालय, मुंबई-३२
७.व्यवस्थापकीय संचालक, एम.एम.आर.डी.ए. मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
९. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१०. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
११. जिल्हाधिकारी (सर्व),
१२. मुख्याधिकारी , नगरपरिषद / नगरपंचायती सर्व,
१३. निवडनस्ती.